महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:-मआ/माव्य /२४९४
दिनांक:- १५/७/२०२६

**-: कार्यालयीन आदेश :-**

**विषय - पुणे महानगरपालिकेकडील विविध प्रकारच्या मालमत्तांचे मुद्रीकरण (Asset Monetization) करून महसुली उत्पन्नात वाढ करण्याच्या अनुषंगाने उपाय योजना करणे कामी समिती गठीत करणे बाबत.**

**संदर्भ — १) मे.महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग जा.क्र.संकिर्ण -२०२५/प्र.क्र.५२/नवि-२० दि.१२/नोव्हेंबर २०२५ चे परिपत्रक.**

**२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(८)**

ज्या अर्थी, पुणे महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाकडे मालकीचे मोकळे भूखंड बांधिव इमारती जसे (हॉस्पिटल, शाळा, भाजी मंडई, विरंगुळा केंद्रे, बहुउद्देशीय हॉल, आरोग्य केंद्र, वाचनालय अभ्यासिका, समाज मंदिरे, अग्निशमन केंद्रे, आर सेवन अंतर्गत निवासी इमारती, व्यावसायिक इमारती) पार्किंग प्लेसेस, ॲमेनिटी स्पेस या मिळकतींचे जतन संरक्षण व देखभाल दुरुस्ती करणे अत्यावश्यक आहे. तसेच नव्याने संपादित/ ताब्यात येणाऱ्या मिळकतींच्या संख्येमध्ये देखील मोठ्या प्रमाणात भर पडत असून महसुली उत्पन्नात भरीव वाढ होण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी ,यातील ब-याच मालमत्ता पूर्णपणे वापरात नसल्याचे किंवा त्यांच्या क्षमतेपेक्षा कमी प्रमाणात वापरात असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा मालमत्तांचा वापर करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवणे, तसेच शहराच्या शाश्वत विकासासाठी BOT/PPP किंवा इतर कायदेशीर उपलब्ध,महसुली उत्पन्नात भर टाकणा-या पर्यायांचा वापर करून मालमत्ता मुद्रीकरण (Asset Monetization) करणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील संबंधित तरतुदींच्या अधीन राहून, सर्व विभागांच्या मालमत्तांचा आढावा घेण्यासाठी आणि **Asset Monetization** अनुषंगाने कार्यपद्धती व मॉडेल निश्चित करण्यासाठी एक **“ विशेष मालमत्ता मुद्रीकरण (Asset Monetization) समिती ”** गठीत करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने उपरोक्त बाबी विचारात घेऊन **विशेष मालमत्ता मुद्रीकरण (Asset Monetization) समिती** मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष)यांचे अध्यक्षतेखाली गठीत करणे बाबत प्रस्तावित करणेत येत असून सदर समितीमध्ये खालीलप्रमाणे अधिकारी यांचा समावेश करणेत येत आहे.

## विशेष मालमत्ता मुद्रीकरण (Asset Monetization) समिती

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १) | मा.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (विशेष) | अध्यक्ष |
| २) | शहर अभियंता | सदस्य |
| ३) | अधीक्षक अभियंता,भवन रचना विभाग | सदस्य |
| ४) | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी | सदस्य |
| ५) | उप आयुक्त, दक्षता | सदस्य |
| ६) | मुख्य अभियंता, प्रकल्प विभाग | सदस्य |
| ७) | विधी अधिकारी, विधी विभाग | सदस्य |
| ८) | उप आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापन विभाग | सदस्य सचिव |

**समितीच्या कामाची व्याप्ती व कार्यकक्षा:-**

१. **मालमत्तांचा शोध व यादी तयार करणे:-** महानगरपालिकेच्या सर्व विभागांकडील वापरात नसलेल्या किंवा पूर्णपणे वापरात नसलेल्या आणि क्षमतेपेक्षा कमी प्रमाणात वापरात असलेल्या मालमत्तांची अचूक माहिती व अद्ययावत यादी तयार करणे.

२. **व्यवहार्यता अभ्यास:-** चिन्हित केलेल्या मालमत्तांचे आर्थिक व कायदेशीर मूल्यमापन करून, त्यांच्याकडून जास्तीत जास्त महसूल कसा मिळू शकतो याचा अभ्यास करणे.

३. **मुद्रीकरण बाबत पर्याय सुचवणे:-** मालमत्ता भाडेतत्त्वावर (LEASING / RENTING ) देणे, परवाना तत्त्वावर देणे, PPP मॉडेल,BOT मॉडेल,संयुक्त विकास,Municipal Bonds, Commercial complex with public amenities किंवा पुनर्विकास तदनुषंगिक योग्य पर्यायाची शिफारस करणे.

४. ज्या विभागांच्या मालमत्तांचा मुद्रीकरणाकरिता विचार विनिमय सुरु असेल त्या विभागाच्या संबंधित प्रमुखांना तसेच आवश्यकते नुसार तज्ञांना निमंत्रित सदस्य म्हणून बोलविण्याचा अधिकार समिती अध्यक्षांना असेल.

५. समितीस आवश्यकता असल्यास ज्या ठिकाणी उपरोक्त नमूद मालमत्ता मुद्रीकरणा बाबत Best Practices यशस्वीरित्या अमलात आणलेल्या आहेत.अशा भारतातील विविध शहरातील प्राधिकरणाना भेटीचे आयोजन देखील करता येईल.

६. सदर समितीने उपरोक्त नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करून दर ३ महिन्यांनी मा.महापालिका आयुक्त यांचेकडेस अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे विशेष मालमत्ता मुद्रीकरण (Asset Monetization) समिती गठीत करण्यात येत असून सदर समितीने शिफारशी आणि आपला सविस्तर धोरणात्मक अहवाल विहित कालावधीत निम्न स्वाक्षरीकार यांचेकडेस मान्यतेस्तव सादर करावा.

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत:-

१) अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/इ/वि)
पुणे महानगरपालिका

यांना माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव .....

प्रत:-

१) सर्व संबंधित खातेप्रमुख

आवश्यक कार्यवाहीसाठी......